(1)

**पदभरती दिनांक २९/०४/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता, आरोग्य विभाग, जि.प.सिंधुदुर्ग**

## थेट मुलाखत - बायोमेडिकल इंजिनिअर

राष्ट्रीय आरोग्य अभियान, - कोवीड १९ अधिन जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग येथे कार्यरत होणेसाठी थेट मुलाखतीदृवारे बायोमेडिकल इंजिनिअर या पदासाठी पदभरती जाहिर करणेत येत आहे. या पदाची भरती निव्वळ कंत्राटी पदृधतीने करणेत येत आहे. उपरोक्त नमुद करणेत आलेल्या पदांबाबत निवडीच्या अटी व शर्ती तसेच इतर आवश्यक ती सर्व माहिती जिल्हा परिषद संकेतस्थळ **www.zpsindhudurg.maharashtra.gov.in** यावर पाहण्यास उपलब्ध आहे. तरी इच्छूक पात्र व्यक्तीनीं संकेतस्थळावरील जाहिरातीत नमुद केलेल्या कागदपत्रासह व संकेतस्थळावरील अर्जाचा नमुना सुचित केलेप्रमाणे भरुन कार्यवाही करणेची आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग

(2)

# थेट मुलाखत दिनांक- 29/04/2021 रोजी सकाळी 10.00 वाजता

थेट मुलाखतीदृवारे भरण्यात येणारे पद- **बायोमेडिकल इंजिनिअर**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, मुख्य प्रशासकीय इमारत तळमजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिंधुदुर्ग अधिनिस्त कोवीड 19 साठी असलेली आवश्यकता लक्षात घेऊन खालील नमुद करणेत आलेली मनुष्यबळ भरती तीन महिने या कालावधीसाठी नेमणूक देणेकरिता खालीलप्रमाणे थेट मुलाखतीचे आयोजन करणेत येत आहे. आवश्यकतेनुसार कंत्राटी पद्धतीने मानधन तत्वावर भरणेसाठी प्रतिक्षा यादी करणेकरिता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन | पदे कार्यरत करावयाची ठिकाणे |
|---|---|---|---|---|
| 1 | बायोमेडिकल इंजिनिअर | B.E. in Biomedical Engineer / B.E. in Electronics Engineer | रु. 25000/- | District Hospital |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमितपणे प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) सदर सेवा निव्वळ जिल्हयातील उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणा-या अधिकारी यांची आवश्यकता लक्षात घेऊन ठराविक कालावधीसाठी भरणेची आहेत. भरावयाची पदे राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेदवारास राहणार नाहीत. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील.

३) सार्वजनिक आरोग्य विभागातुन सेवानिवृत्त कर्मचारी विहित वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेचा निकष पुर्ण करीत असतील तर अर्ज करु शकतील.

४) उपरोक्त पदाची शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा-या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके थेट मुलाखतीवेळी घेऊन येणेची आहेत.

५) निवड झालेल्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचा-यांप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बॉन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

६) उमेदवारांना गुणांकन यादी विहित शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या टक्केवारीच्या 70 टक्के यासाठी 70 गुण, उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी 10 गुण व शासकीय अगर निमशासकीय अनुभवासाठी वर्षाला 4 गूण याप्रमाणे एकूण 20 गुण अशा प्रकारे 100 गुणांचे मुल्यांकन करणेत येईल.

७) कोवीड 19 साठी पदांचे आवश्यकतेनुसार प्रतिक्षा यादीचे क्रमांकानुसार उमेदृवारांना नियुक्ती आदेश देय राहतील.

८) अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

९) शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची प्रशासकीय/ वित्तिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१०) भरती प्रकियेतील सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

जिल्हा शल्य चिकित्सक

जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग